



महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ 14 मार्च 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 257 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024


# होळीत जबदस्ती केल्यास दंड आणि कायदेशीर कारवाई



## पाण्याचे फुगे फेकाल तर..

**रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांवर लोक रंग फेकत असल्याचे अनेकदा दिसून आले. त्यामुळे अनेकवेळा पाण्याचे फुगे लोकांवर फेकले जातात. पण असे केल्याने तुम्ही अडचणीत येऊ शकता. या कामासाठी तुम्हाला तुरुंगातही जावे लागू शकते. यासाठी काय नियम आहेत ते आम्ही तुम्हाला सांगतो. होळीच्या दिवशी कोणी पाण्याचा फुगा फेकत असेल तर त्याच्यावरतीही कारवाई होऊ शकते. यासाठी बीएनएसवर वेगवेगळ्या कलमांतर्गत गुन्हा दाखल होऊ शकतो. अशा परिस्थितीत बीएनएस कलम 120(1) अन्वये गुन्हा दाखल केला जाऊ शकतो. कलम 120(1) अन्वये जाणून बुजून दुखापत केल्याच्या आरोपाखाली तुरुंगात पाठवले जाऊ शकते. यामुळे एक वर्षाचा तुरुंगवास होऊ शकतो. यासोबतच दहा हजार रुपयांपर्यंतचा दंडही होऊ शकतो किंवा दोन्ही शिक्षा भोगावी लागू शकते.**

## जबरदस्तीने रंग लावाल किंवा पाण्याचे फुगे फेकाल; तर थेट तुरुंगवास

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**होली हैं... बुरा ना मानो होली हैं... म्हणत कोणावरही साध्या पाण्याचे किंवा रंगमिश्रित पाण्याचे फुगे मारणे, महिला-तरुणींना पाहून अश्लील भाष्य, कृत्य करणे महागात पडू शकते. होळी आणि धुळवडीचा मनसोक्त आनंद लुटा, पण शिस्तीचे पालन करा. रंगाचा बेरंग करताना कोणी सापडला तर क्षमा केली जाणार नाही, असा इशारा मुंबई पोलिसांनी दिला आहे. सण साजरा करताना कोणालाही त्रास होणार नाही याची सर्वांनी काळजी घ्यायची आहे. नियम पायदळी तुडवू नका, जाणीवपूर्वक कोणी मस्ती करताना सापडलाच तर कारवाई अटळ आहे. दारू ढोसून गाडया चालवू नका, बेकायदेशीर दारूची तस्करी करू नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.**

होळी हा आनंदाचा, रंगांचा आणि आपुलकीचा आहे. उद्या म्हणजेच 14 मार्च रोजी देशभरात होळी साजरी होणार आहे. होळीच्या दिवशी संपूर्ण देश वेगवेगळया रंगात रंगणार आहे. रस्ते, गल्ल्या, सर्व रंगांनी रंगवलेली दिसून येतील. या दिवशी, लोक होळीचा सण त्यांच्या कुटुंबियांसह, मित्र आणि परिचितांसह मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करतात. एकमेकांवर रंग आणि गुलाल उधळला जातो. मात्र, काही ठिकाणी लोक अनोळखी व्यक्तींवर रंग फेकत असल्याचेही दिसून येते. अनेक वेळा रस्त्यावरून जाणाऱ्यांना रंग लावण्याची सक्ती केली जाते. तुम्हालाही कोणालाही जबरदस्तीने रंग लावण्याची आवड असेल तर. मग सावध राहा. कारण असं करणाऱ्यांना त्याची शिक्षा मिळू शकते, कोणालाही जबरदस्तीने रंग लावल्यास तुमच्या अडचणी वाढू शकतात. बळजबरीने इतरांवर रंग लावल्यास तुम्ही तुरुंगात जाऊ शकता. याबाबत कोणते नियम बनवले आहेत ते आधीच जाणून घ्या. होळीच्या दिवशी बळजबरीने रंग लावून कोणाचे काही नुकसान होत असल्यास अशा परिस्थितीत तुम्हाला BNS च्या कलम 125 अंतर्गत 5000 रुपये दंड भरावा लागू शकतो किंवा तुम्हाला 1 वर्ष किंवा दोन्ही तुरुंगवास होऊ शकतो. जर कोणी महिलांना, तरूणींना जबरदस्तीने रंग लावत असल्यास मग बीएनएस कलम 79 अंतर्गत महिलेच्या प्रतिष्ठेचा अपमान केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला जाऊ शकतो. ज्यामध्ये 3 वर्षांपर्यंतची शिक्षा होऊ शकते आणि दंड आकारला जाऊ शकतो. होळीच्या दिवशी एखाद्याचा रस्ता अडवला जातो आणि त्याच्यावर जबरदस्तीने रंग टाकले जातात आणि त्रास दिला जातो. मग बीएनएस कलम 345 अंतर्गत गुन्हा दाखल केला जाऊ शकतो. ज्यामध्ये 1 महिन्याची तुरुंगवास किंवा 5000 रुपये दंड होऊ शकतो. किंवा दोन्ही शिक्षा असू शकतात.

एखाद्याला रंग लावण्याची सक्ती केली तर मारामारी आणि हाणामारी होते. मग अशा प्रकरणात बीएनएस कलम 150 अंतर्गत गुन्हा दाखल केला जाऊ शकतो. ज्यामध्ये 10 वर्षांपर्यंत शिक्षेची तरतूद आहे. त्यामुळे होळीवर रंग लावण्यापूर्वी या गोष्टी लक्षात ठेवा. आपल्या प्रियजनांसोबत होळी साजरी करा.

## निधी मिळूनही भुसंपादन नाही

# दिवा रुग्णालयाच्या उभारणीवर प्रश्नचिन्ह

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : महापालिकेच्या वेशीवर असलेल्या दिवा परिसरात रुग्णालय उभारण्याकरीता आवश्यक असलेल्या भूसंपादनासाठी राज्याच्या नगरविकास विभागाने ५८ कोटी रुपयांचा निधी दोन वर्षांपुर्वी मंजूर केला असून या रुग्णालयाची घोषणा यंदाच्या अर्थसंकल्पात करणाऱ्या ठाणे महापालिकेला रुग्णालयाच्या जागेसाठी अद्याप भुसंपादन करणे शक्य झालेले नाही. नागरीकांच्या विरोधामुळे भुसंपादनात अडचणी येत असल्याचे पालिकेचे म्हणणे असून या संदर्भात ठाणे महापालिका प्रशासनाने जिल्हाधिकाऱ्यांना नुकतेच पत्र पाठवून रुग्णालयाची गरज लक्षात घेऊन येथील भुसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करण्यास सांगितले आहे.

ठाणे महापालिकेच्या वेशीवर असलेल्या दिवा परिसराची लोकसंख्या चार ते पाच लाखांच्या आसपास आहे. दिवा शहरातील नागरिकांना आरोग्य सेवेसाठी ठाणे, मुंबई तसेच इतर मोठ्या शहरात जावे लागते.

या पार्श्वभूमीवर पालिकेने दिवा शहरात सात ठिकाणी 'वंदनीय हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' सुरू केले आहेत. या दवाखान्यात नागरिकांना मोफत तपासणी औषध दिली जातात. या दवाखान्यात उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्यादेखील खूप मोठी आहे. परंतु पुढील उपचारासाठी नागरिकांना इतर शहरांमध्ये जावे लागत आहे. त्यामुळे दिव्यात रुग्णालय उभारणीची मागणी होत होती. हि बाब लक्षात घेऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोन वर्षांपुर्वी मुख्यमंत्री पदाच्या काळात राज्याच्या नगरविकास विभागामार्फत दिवा परिसरात रुग्णालय उभारण्याकरीता आवश्यक असलेल्या भूसंपादनासाठी ५८ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. हा निधी पालिकेला प्राप्त झाला असून त्याचा उल्लेख यंदाच्या अर्थसंकल्पात ठाणे महापालिकेने

दोन वर्षांपुर्वी निधी मिळूनही ठाणे महापालिकेला दिवा रुग्णालयाच्या जागेसाठी भुसंपादन करणे शक्य झालेले नाही. दिवा येथील आगासन भागातील २५ हजार चौरस मीटर क्षेत्रावर १०० खाटांचे रुग्णालय उभारण्याचे पालिकेचे नियोजन आहे.

टीडीआर स्वरुपात मोबदला देण्याचा प्रस्ताव पालिकेने बाधितांपुढे ठेवला होता. मात्र, त्यास बाधितांनी नकार दिल्यानंतर पालिकेने रोख रक्कम स्वरुपात मोबदला देण्याचा निर्णय घेऊन तसा प्रस्ताव पालिकेने राज्य शासनाला पाठविला होता. त्यानुसार राज्य शासनाने भुसंपादनासाठी ५८ कोटी रुपये दिले होते. या जागेच्या भुसंपादनासाठी सर्वेक्षण करणे गरजेचे आहे. मात्र, त्यास काही नागरिकांच्या विरोधामुळे सर्वेक्षण प्रक्रीया रखडली आहे.

## जनता दरबारातील तक्रारींची ऑनलाईन नोंदणी आवश्यक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली पालिकेच्या जनता दरबारात सहभागी होण्यासाठी नागरिकांना यापुढे आपल्या तक्रारी कल्याण डोंबिवली पालिकेच्या 'केडीएमसी २४ बाय सात' या उपयोजनवर ऑनलाईन माध्यमातून अगोदर नोंदणीकृत करणे आवश्यक आहे. या तक्रारींची प्रशासनाकडून छाननी झाल्यानंतर या तक्रारी जनता दरबारात घेतल्या जातील, असे कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दर महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी दुपारी तीन ते पाच वेळेत आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांचा जनता दरबार असतो. या दरबारात आपले म्हणणे मांडण्यासाठी सुमारे दोनशेहून अधिक नागरिक नागरी समस्या आणि पालिकेशी संबंधित इतर तक्रारी घेऊन येतात. दोन तासांच्या अवधीत एवढ्या तक्रारींचे निराकरण करणे शक्य होत नाही. त्यामुळे अनेक नागरिक नाराज होतात. पालिका अधिकाऱ्यांना नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागते. यापुढे जनता दरबारात दाखल होणारी तक्रार ही पहिले पालिकेच्या अधिकाऱ्यांकडून तपासली जाईल. या तक्रारीचे स्वरुप आणि ही तक्रार पुन्हा पुन्हा आयुक्तांसमोर मांडली जाते का, याची खात्री पटल्यावरच ती तक्रार जनता दरबारासाठी घेतली जाईल. सतत त्याच स्वरुपाच्या तक्रारींची छाननी करून मगच त्या जनता दरबारात घेण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील अनेक नागरिक आपल्या तक्रारी शासनाचे विविध विभाग, आपले सरकार, समाज माध्यमांतून करत असतात. शासनाच्या विविध विभागातून त्या तक्रारी निराकरण करण्यासाठी पालिकेत पाठविल्या जातात. त्याचवेळी नागरिकही त्याच तक्रारी घेऊन पालिकेत जनता दरबारात येतात. एका तक्रारीसाठी पालिका अधिकाऱ्यांना शासन, त्यांचे विविध विभाग यांनाही उत्तर द्यावे लागते. समाज माध्यमातील तक्रारींना स्पष्टीकरण द्यावे लागते. एकाच साच्यातील तक्रारींचे स्वरूप कमी करण्यासाठी, काही ठराविक तक्रारदार हे ठराविक तक्रारी करत असल्याचे निदर्शनास आले आहे. या सगळ्या एकाच प्रकारच्या वाढत्या तक्रार अर्ज आणि त्यांना उत्तरे देण्याच्या प्रक्रियेला आळा बसावा. प्रत्येक तक्रारीचे पालिका अधिकाऱ्यांना निराकरण करता यावे, एकाच ठराविक तक्रारदाराची तक्रार जनता दरबारात उत्तर देण्यासाठी येऊ नये साठी प्रशासनाने जनता दरबारात तक्रार दाखल करण्यापूर्वी ती पालिकेच्या ऑनलाईन उपयोजनवर दाखल करावी. या तक्रारींची पालिका अधिकारी दखल घेऊन त्याचे निराकरण करतील.

ऑनलाईन माध्यमातून छाननी झालेल्या तक्रारीच आयुक्तांच्या जनता दरबारात घेण्यात येतील. यापूर्वी जनता दरबारात निकाली काढलेल्या तक्रारी पुन्हा जनता दरबारात विचारात घेतल्या जाणार नाहीत, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.आतापर्यंत आयुक्तांनी अनेक वेळा जनता दरबार आयोजित केले, पण त्या दरबारात आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड उपस्थित नव्हत्या, अशा तक्रारी निर्भय बनोचे संस्थापक महेश निंबाळकर, तक्रारदार उज्वला पाटील यांनी केल्या.

# ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रोसाठी चार वर्षे प्रतीक्षा ?

**ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो प्रकल्पामुळे तीन शहरे एकमेकांना जोडली जाणार असून हा प्रकल्प महत्वाचा मानला जात आहे. २३.८ किमी लांबीचा हा प्रकल्प असून त्याचे काम २०१९ मध्ये हाती घेण्यात आले होते. या मार्गाची कामे दोन टप्प्यात करण्यात येत असून पहिल्या टप्प्यात ठाणे ते भिवंडी पर्यंतच्या मेट्रो सेवा सुरू करण्यात येणार आहे. या मेट्रो मार्गावरील स्थापत्य कामे ९४ टक्के पूर्ण झाली आहे. तर, भिवंडी ते कल्याण परिसराला जोडणारी मार्गिकेच्या कामाबाबत मात्र, अहवालात माहिती देण्यात आलेली नाही. या मार्गिकेचे का! पूर्ण होण्यासाठी २०२९ उजाडेल असा अंदाज अहवालात वर्तविण्यात आला आहे. मिरारोड येथील गायमुख ते शिवाजी चौक या मेट्रो प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असल्याचा उल्लेख करत हे काम डिसेंबर २०२७ मध्ये पूर्ण होईल, असा दावा अहवालात करण्यात आला आहे. नवी मुंबई सीबीडी बेलापूर ते पेंधर ही मेट्रो सेवा सुरु झाली असली तरी कल्याण-तळोजा मेट्रो प्रकल्पाची स्थापत्य कामे जेमतेम ३ टक्के इतकीच झाल्याची बाब अहवालातून समोर आली आहे.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे जिल्ह्यातील शहरे एकमेकांना जोडण्यासाठी गेल्या सहा ते सात वर्षांपासून उभारण्यात येत असलेल्या मेट्रो प्रकल्पाची कामे संथगतीने सुरू असल्याची बाब राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालातून समोर आली आहे. कल्याण-तळोजा मेट्रो प्रकल्पाची स्थापत्य कामे जेमतेम ३ टक्के इतकीच झाले असून वडाळा ते कासारवडवली मेट्रोसाठी दोन वर्ष तर, ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रोसाठी चार वर्षे नागरिकांना वाट पाहावी लागणार असल्याचे स्पष्ट होत आहे.







ठाणे जिल्ह्यातील रस्ते तसेच रेल्वे वाहतूकीवरील प्रवाशांचा भार कमी व्हावा तसेच नागरिकांना सार्वजनिक वाहतूकीसाठी नवा पर्याय उपलब्ध व्हावा या उद्देशातून राज्य सरकारने मुंबईसह ठाणे जिल्ह्यात मेट्रो प्रकल्पाचे जाळे विणण्याचा निर्णय घेतला. या नुसार, ठाणे जिल्ह्यात वेगवेगळया मेट्रो मार्गांची घोषणा करण्यात आली असून या सर्व प्रकल्पांची कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहेत. मेट्रोच्या माध्यमातून जिल्ह्यातील ठाणे, भिवंडी, कल्याण, मिरारोड यासह तळोजा परिसर एकमेकांना जोडण्यात येणार आहेत. परंतु या सर्व प्रकल्पाची कामे संथगतीने सुरू असल्याची बाब राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालातून समोर आली असून यामुळे ठाणे जिल्ह्यातील नागरिकांना आणखी काही वर्षे मेट्रोची प्रतीक्षा करावी लागणार असल्याचे स्पष्ट होत आहे.






# जीवनदीप महाविद्यालय खर्डी येथे तंबाखूजन्य पदार्थांची होळी करून व्यसनमुक्त होळी साजरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

तंबाखूजन्य पदार्थांची होळी करून जीवनदीप महाविद्यालय खर्डी येथे व्यसनमुक्त होळी साजरी.आज दि. १३ मार्च २०२५ रोजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने संस्थेचे अध्यक्ष श्री रविंद्र घोडविंदे सर यांच्या संकल्पनेतून तंबाखूजन्य व अंमली पदार्थांची होळी करण्यात आली. 'मादक द्रव्याची नशा, अनमोल जीवनाची दुर्दशा' असा संदेश याप्रसंगी विद्यार्थ्यांना देण्यात आला. होळी पूजन श्री शाम धुमाळ (सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार) यांच्या हस्ते करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य कैलास कळकटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रियांका पवार व प्रा. राहुल सोनावणे, महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्सेवयंसेवक आणि विद्यार्थी उपस्थीत होते.





## गीतासार



**ज्ञानकर्मसंन्यासयोगः**

तस्मादज्ञानसम्भूतं हृत्स्थं ज्ञानासिनात्मनः । छित्त्वैनं संशयं योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत ॥ ४-४२ ॥

म्हणून हे भरतवंशी अर्जुना, तू हृदयात असलेल्या या अज्ञानाने उत्पन्न झालेल्या आपल्या संशयाचा विवेकज्ञानरूपी तलवारीने नाश करून समत्वरूप कर्मयोगात स्थिर राहा आणि युद्धाला उभा राहा. ॥ ४-४२ ॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे ज्ञानकर्मसंन्यासयोगो नाम चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥

ॐ हे परमसत्य आहे. याप्रमाणे श्रीमद्‌भगवद्‌गीतारूपी उपनिषद तथा ब्रह्मविद्या आणि योगशास्त्राविषयी श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या संवादातील ज्ञानकर्मसंन्यासयोगः नावाचा हा चवथा अध्याय समाप्त झाला. ॥ ४ ॥

# आनंदाचा क्षण होळी सण

भारत संस्कृतीप्रधान, कृषिप्रधान देश असल्यामुळे साजऱ्या होणाऱ्या अनेक सणांपैकी होळी या सणाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले दिसते. अनेक राज्यात तो वेगवेगळया पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरा होत असतो. विशेष करुन नेपाळी लोकांमध्ये हा सण फार महत्वाचा मानला जातो आणि ते खूप आनंदाने हा हा सण साजरा करतात. हा सण साजरा करण्याची परंपरा वेगळी आहे पण तितकीच ती खास आकर्षक आहे. फाल्गुन महिन्याच्या पौर्णिमेपासून त्याची सुरुवात होते. या काळात उभी येणाऱ्या वसंताच्या आनंदाची घोषाळा असते. वसंतोत्सवाला सुरुवात होते. वसंताच्या आगमनाने निसर्गात काही बदल घडून येतात.

होळी सण साजरा करण्यामागे वाईटावर चांगल्याचा विजय मिळविण्याचे प्रतीक होय. प्राचीन काळापासून हे सर्व प्रचलीत आहे. हा सण सुरुवातीला बंगालमध्ये खेळला जात असला तरी तो भारतातील ब्रज या प्रदेशातील भगवान श्रीकृष्णाच्या मथुरा, वृंदावन, बरसाना आणि नंदागाव या शहरात मोठ्या प्रमाणात उत्साहाने साजरा केला जात असे. म्हणूनच त्या ठिकाणी ह्या काळात पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी पाहायला मिळते. होळी या सणाला रंगाचा सण म्हणून म्हटले जाते. महाराष्ट्रात होळीच्या दिवशी समिधा म्हणून काही लाकडे मंत्रोच्चारात जाळण्यात येतात आणि पेटलेल्या होळीभोवती प्रदक्षिणा घालतात तसेच होळीची पूजा करून नारळ अर्पण करून पुरणपोळीचा नैवेद्य दाखवण्याची प्रथा आहे. हेच होलिकादहन असून समाजातील दुष्ट प्रवृत्ती, वाईट चालीरितींचा नाश केला जातो.



राथा अणि कृष्ण यांच्या प्रेमाचे वर्णन असणारे होळी सणाचे संदर्भ दिसून येतात. 'गर्ग संहिता' या ग्रंथात कृष्णाने साजरी केल्याचा उल्लेख नमूद केला आहे. होळी पेटण्यामागे शास्त्रीय कारण असे की थंडीनंतर सुरु होणाऱ्या उन्हाळ्याचा ऋतू संधिकाळमध्ये

**लेखक**
**लीना बल्लाळ**
**ठाणे पश्चिम**

रोगजंतूचा प्रसार होण्याचा धोका अधिक असतो. त्यामुळे रोगजंतूचा नाश करण्यासाठी तसेच त्रासदायक कीटकाचा नाश करण्यासाठी होलीदहन केले जाते.

होलीदहन मनुष्याला आपल्या मनातील वाईट विचारांना आगीत जाळून राख करावी या गोष्टीचे प्रतीक आहे. वाळलेली पाने, लाकडे एकत्र करून जाळणे हा होळीचा उद्देश असतो त्यामुळे आपल्या मनातील मलीनता नष्ट होऊन ते निर्मळ व्हावे अशी अपेक्षा असते. तसेच गव्हाचे पीक आलेले असते, त्याच्या ओंब्या भाजण्याची प्रथा आहे. ते अग्निदेवतेला समर्पित केले जाते. दुसऱ्या दिवशी धुलीवंदन म्हणजे धुळवड खेळली जाते. लहानापासून वयोवृद्धांपर्यंत सगळे एकत्र येऊन एकमेकांच्या अंगावर तयार केलेल्या खास नैसर्गिक रंगांची उधळण करून मजा लुटतात. मुख्य म्हणजे सर्वांनी एकत्र येऊन एकतेने बंधूभावाने सण साजरा करणे हा हेतु असतो. आपापसातील द्वेष, भांडणे, हेवेदावे विसरून हा सण साजरा करण्यातच आनंद असतो.

# धुलिवंदन

धूलिवंदन हा सण होळीच्या दुसऱ्या दिवशी साजरा केला जातो. यास धुळवड असेही म्हटले जाते. या दिवशी महाराष्ट्रात सार्वजनिक सुट्टी असते. हा सण फाल्गुन कृष्ण प्रतिपदेला साजरा करतात. परंपरेप्रमाणे या दिवशी होलीका दहनाची राख एकमेकांना लावतात. प्रत्येक गावाचे धूलिवंदन वेगवेगळया दिवशी असू शकते. फाल्गुन हा शालिवाहन शक महिन्यातील शेवटचा महिना आहे. त्यामुळे होळी हा हिंदू दिनदर्शिकेनुसार येणाऱ्या महिन्यातील शेवटचा सण असतो. होळी पेटवून दुसऱ्या दिवशी म्हणजे धुलीवंदनाच्या दिवशी जमिनीला, मातीला नमस्कार करण्याची





प्रथा आहे. प्रत्येक प्राणी मात्राचा देह हा पंचमहाभूतांपासून बनलेला असतो. पृथ्वी, आप, त्वज, वायू, आकाश असा या पंचमहाभूतांचा क्रम आहे. पृथ्वी पासून सुरुवात आणि आकाशापर्यंत शेवट असे पंचक असणाऱ्या या तत्वांना आपल्या सणांच्या मधून आदर व्यक्त करण्याचा एक दिवस म्हणजे धूलिवंदन. यादिवशी पृथ्वीला वंदन केले जाते. त्यानंतर १५ दिवसांनी नववर्षाची म्हणजे पाडव्याच्या दिवशी आकाशाला भिडणारी गुढी उभारण्याची पद्धत आहे. या दिवशी सकाळी घरातील बायका पाण्याची तपेली, घागरी, हंडे पाण्याने भरुन होळी पेटवलेल्या जागी ठेवतात. सूर्याच्या उन्हाने हे पाणी तापते. या पाण्याने लहान मुलांना अंघोळ घालतात. असे मानले जाते की या पाण्याने अंघोळ केली असता लहान मुलांना किंवा कोणालाही उन्हाळा बाधत नाही. या दिवसात कैऱ्याही मिळू लागतात. कैऱ्या उकडून त्याचा गर लहान मुलांना अंगाला लावून स्नान घालतात. मोठी माणसे होळीवर पाणी शिंपडून ती राख कपाळाला लावतात. अंगाला फासतात व नंतर स्नान करतात.

काही ठिकाणी आजकाल लोकांनी आपापल्या सोयीनुसार होळीच्या दुसऱ्या दिवशी रंगपंचमी साजरी करण्याची प्रथा सुरु केली आहे. त्यात लहान-मोठे, स्त्रिया-पुरुष सरसकट सगळे उत्साहाने रंग खेळतात. परंतु रंगपंचमी हा वेगळा सण आहे.


# यंदा पुरणपोळीच्या गोडव्याला महागाईची चव

## किमतीमध्ये पाच रुपयाची वाढ, खवय्यांकडून भरपूर खरेदी!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : ग्रामीण भागात तसेच आदिवासी पट्टयात होळी म्हटली की तुपाच्या धारेसोबत गरम पुरणपोळीची आठवण येते. होळीला पुरणपोळीचा नैवेद्या लागतोच. आजही ग्रामीण भागात गृहिणी पुरणपोळया बनविण्यास प्राधान्या देतात.

तर घर आणि नोकरी अशी दुहेरी जबाबदारी पेलणाऱ्या कारभारणी रेडिमेड पुराणपोळी आणण्यास पसंती देतात. मात्र यंदाच्या पुरपोळीच्या गोडव्याला महागाईचा रंग चढला आहे. पुरणपोळी गेल्या



वर्षीपेक्षा पाच रुपयांनी महागली आहे. मात्र तरीही मुरबाड तालुक्यातील म्हसा , धसई , सरळगाव,टोकावडे,शिवले, या प्रमुख बाजारपेठेत ,विक्रीवर कोणताही परिणाम होणार नसल्याचे विक्रेत्यांने सांगितलेआहे. पूर्वी होळीची चाहूल लागल्यावर घरोघरी पुरणाचे साचे घासूनपुसून ठेवले जात. होली म्हटली की नवीन नवीन कपडे लहान बच्चे पासून तर वयोवृद्ध माणसे कपडे टेलरकडे शिवायला टाकायचे,मात्र आता रेडीमेड कपडे घेण्याचा जमाना आला आहे. त्याचप्रमाणे काळ दलल्याने रेडिमेड पुरणपोळीची ऑर्डर देण्यासाठी नोकरदार महिलांची लगबग दिसून येत आहे. सर्वच क्षेत्रात महागाई वाढल्यामुळे पुरणपोळीही त्याला अपवाद ठरलेली नाही.

# निरंकारी मिशनच्या रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : समाजातील एक हृदयस्पर्शी एकात्मतेचे उदाहरण म्हणून आयोजित रक्तदान शिबिरात तब्बल ३२३ स्वयंसेवकांनी रक्तदान करत आपली सामाजिक बांधिलकी जपली. संत निरंकारी मिशनच्या संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने आयोजित या उपक्रमातून "मानवतेचा करू सन्मान, मिळून करू रक्तदान" असा प्रेरणादायी संदेश देण्यात आला. हे शिबिर संत निरंकारी सत्संग भवन, कळवा येथे रविवारी पार पडले.



## ३२३ निरंकारी भक्तांनी केले रक्तदान

या उपक्रमात छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, ठाणे यांनी १०५ युनिट तर संत निरंकारी ब्लड बँक, विलेपार्ले यांनी २१८ युनिट रक्त संकलन केले. या शिबिरात ठाणे सेक्टर संयोजक आर. एस. यादव, क्षेत्रीय संचालक अमोल सुर्वे, कळवा शाखा मुखी कांतिराम सेमवाल, संचालक भावेश लोखंडे आदींसह इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. या रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन सेवादल स्वयंसेवक व संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या स्वयंसेवकांद्वारे करण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून संत निरंकारी मिशनकडून "वैश्विक बंधुत्व व मानवतेची सेवा" हा संदेश सातत्याने प्रसारित केला जात आहे.

# विनोद सम्राट : दादा कोंडके

आज १४ मार्च, आपल्या इरसाल आणि गावरान भाषेतील विनोदाने महाराष्ट्राला खळखळून हसवणारे विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके यांचा स्मृतिदिन. जवळपास तीन दशकांहून अधिक काळ मराठी चित्रपट सृष्टीवर एकहाती अधिराज्य गाजवून मराठी सिनेमाला सुवर्णकाळ दाखवणाऱ्या विनोद सम्राट दादा कोंडके यांचा जन्म ८ ऑगस्ट १९३२ रोजी मुंबईतील नायगाव येथे झाला. त्यांचा जन्म झाला तो दिवस गोकुळ अष्टमीच्या होता, आपल्या पोटी बाळकृष्ण जन्माला आला म्हणून आई वडिलांनी त्यांचे नाव कृष्णा ठेवले. पण लहानपणापासूनच सर्व जन त्यांना दादा म्हणत पुढे त्यांचे नाव रूढ झाले. त्यांच्या मोठ्या बंधूचे निधन झाल्याने त्यांच्यावर घराची जबाबदारी पडली त्यामुळे दादा दरमहा साठ रुपये पगारावर सेवादलाच्या बँड पथकात काम करू लागले. लहानपणापासून दादांना कलेची आवड होती. सेवादलाच्या बँड पथकात त्यांच्या कला आणखी बहरून आल्या. फावल्या वेळात प्रसिद्ध गाण्यांचे विडंबन करणे, गाण्यांना चाली लावणे, विचित्र गाणी रचणे असे उद्योग दादा करू लागले. निळू फुले, राम नगरकर यासारखे जेष्ठ कलाकारही त्या काळात सेवादलात होते. तिथेच दादांची या महान कलाकारांशी मैत्री झाली आणि ही मैत्री पुढे आयुष्यभर टिकून राहिली. दादा सेवादलाच्या बँड पथकात काम करत असल्याने त्या काळात त्यांना बँड वाले दादा म्हणूनच



लोक ओळखत असे. पुढे दादांनी स्वतःचा फड काढला. गावोगावी जाऊन दादा स्वतःची कला सादर करू लागले. वसंत सबनिसांच्या विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने दीडशे प्रयोग पूर्ण केले. त्या काळी हा विक्रम होता. या वगनाट्यामुळे दादा भलतेच लोकप्रिय झाले. गावागावांतील रसिक प्रेक्षक दादांना ओळखू लागले. याच वगनाट्यातील त्यांचे काम पाहून महान दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांनी त्यांना थेट चित्रपटात काम करण्याची संधी दिली. भालजी पेंढारकर यांनी त्यांना त्यांच्या तांबडी माती या चित्रपटात मुख्य भूमिका दिली. दादांनी या भूमिकेचे सोने केले. हा चित्रपट तिकीटबारीवर हिट झाला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. या चित्रपटानंतर दादांनी मागे वळून पाहिले नाही. मराठी चित्रपट सृष्टीत दादा कोंडके हे सर्वत्र नाव घुमू लागले. १९७१ साली दादा कोंडके यांनी दिग्दर्शित केलेला सोंगाड्या हा चित्रपट प्रदर्शित झाला मात्र मुंबईतील चित्रपटगृह चालकांनी आपल्या चित्रपटगृहात सोंगाड्या न लावता तीन देविया हा हिंदी चित्रपट लावला. आपल्या पहिल्याच चित्रपटाला चित्रपटगृह मिळत नसल्याचे पाहून दादा उद्विग्न झाले आणि त्यांनी थेट बाळासाहेब ठाकरेंची भेट घेतली मग काय बाळासाहेबांचा आदेश आणि शिवसैनिकांचा चित्रपटगृहात राडा. शिवसैनिकांनी चित्रपटगृहात घातलेल्या राड्याने आणि बाळासाहेबांच्या आदेशाने सोंगाड्या चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. नुसताच प्रदर्शित झाला नाही तर सुपर डूपर हिट झाला. सोंगाड्या पाहायला प्रेक्षकांच्या रांगा लागल्या. सोंगाड्या हा त्या काळातील सर्वाधिक हिट मराठी चित्रपट ठरला. सोंगाड्यामुळे मरगळलेल्या मराठी चित्रपट सृष्टीला ऊर्जितावस्था मिळाली. तमाशापटाला कंटाळलेल्या मराठी चित्रपट रसिकांना सोंगाड्यात दादांनी आपल्या विनोदाने मनमुराद हसवले. दादांच्या विनोदाला मराठी रसिकांनी मनमुराद दाद दिली. सोंगाड्याच्या अभूतपूर्व यशानंतर दादा कोंडके यांनी आणखी एका नव्या चित्रपटाची घोषणा केली या चित्रपटाचे नाव होते एकटा जीव सदाशिव. सोंगाड्यामुळे दादांची लोकप्रियता तुफान वाढली होती. या लोकप्रियतेचा धसका हिंदी चित्रपट सृष्टीनेही घेतला होता. दादांनी एकटा जीव सदाशिव या चित्रपटाची घोषणा केल्यावर राज कपूर यांनी त्यांच्या मुलासाठी म्हणजे ऋषी कपूर साठी काढलेला बॉबी या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली. सोंगाड्या पाठोपाठ एकटा जीव सदाशिव हा चित्रपटही सुपर हिट झाला. त्यानंतर दादांनी पांडू हवालदार या चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटात दादांनी अशोक सराफ यांना संधी दिली. हा चित्रपटही यशस्वी ठरला मग काय त्यानंतर दादांच्या यशस्वी चित्रपटांची मालिकाच सुरू झाली. तुमचं आमचं जमल, राम राम गंगाराम, बोट लावील तिथं गुदगुल्या, ह्योच नवरा पाहिजे, आली अंगावर, मुका घ्या मुका, पळवा पळवी, येऊ का घरात, सासरचे धोतर असे दादांचे सलग चित्रपट यशस्वी झाले. सलग नऊ रौप्य महोत्सवी चित्रपट देण्याचा विक्रम दादांनी केला. त्यांच्या या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली. त्यांच्या यशस्वी चित्रपटात त्यांच्या इरसाल विनोदाचा जितका वाटा होता तितकाच त्या चित्रपटातील श्रवणीय गाण्यांचा देखील होता. दादा कोंडके यांच्या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. आजही दादांच्या चित्रपटातील गाणी तितकीच लोकप्रिय आहेत. दादांचे चित्रपट जितके लोकप्रिय झाले तितकेच ते वादग्रस्तही ठरले. त्यांच्या सर्वच चित्रपटांना सेन्सॉर बोर्डने आडकाठी आणली मात्र दादांनी सेन्सॉर बोर्डाच्या या दंडेली पुढे कधीही नमते घेतले नाही उलट सेन्सॉर बोर्डशी त्यांनी कायम दोन हात केले. ज्या शिवसेनेमुळे त्यांचे चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होऊ शकले त्या शिवसेनेशी त्यांनी कधीही प्रतारणा केली नाही. आयुष्यभर त्यांनी शिवसेनेशी बांधिलकी राखली. १४ मार्च १९९८ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. दादांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वावर दुःखाचा डोंगर कोसळला. प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या विनोदाच्या या सम्राटाने अशी अकाली एक्झीट घेतल्याने प्रेक्षकांना मोठा धक्का बसला. त्यांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वाला सुवर्णकाळ दाखवणारा विनोदाचा सम्राट काळाच्या पडद्याआड गेला. मराठी चित्रपट सृष्टीत त्यांच्यासारखा विनोद सम्राट पूर्वी झाला नाही आणि पुढेही होणार नाही. विनोद सम्राट दादा कोंडके यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

- श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

## धार्मिक
## सणाची माहिती



**धूलिवंदन साजरे करण्याच्या प्राचीन पद्धतीः**

पूर्वी धुलिवंदन साजरी करण्याची एक पद्धत होती. ती म्हणजे होळी जळून झाल्यानंतर जी राख असायची त्या राखेचे किंवा ते भस्म आपल्या शरीराला लावायचे आणि त्यानंतर स्नान करायचे. म्हणजे आपण त्या धुळीला वंदन केले. ती धूळ जी पवित्र आहे. तिच्या पुढे आपण नतमस्तक झालो.

तसेच घरातील स्त्रिया पाण्याने भरलेला हंडा होळीच्या राखेवरती ठेवायच्या. त्या पाण्यामध्ये सूर्यप्रकाश पडायचा व ते गरम पाणी जे सूर्यप्रकाशात ठेवलेले होते. त्यांनी लहान मुलांना आंघोळ घातली जायची. यामुळे त्या मुलांना उन्हाळा लागत नाही अशी समज होती.

अजून काही उदाहरणे द्यायची झाली, तर पूर्वी श्रीकृष्ण आणि राधा यांची देखील होळी आपल्याला ऐकण्यात आली असेलच.

जिथे नैसर्गिक रंगापासून किंवा फुलांपासून तयार केलेल्या रंगांपासून होळी खेळली जायची. एकमेकांवरती फुलांची उधळण केली जायची आणि अशा पद्धतीने कुठचीही इजा न होता होळीचा/ धुलिवंदनचा/ रंगपंचमीचा आस्वाद घेतला जायचा

तर ह्या होत्या आपल्या प्राचीन पद्धती, प्राचीन रीतीरीवाज. ज्याने धुलीवंदन साजरी व्हायचे.

**सध्याचे धूलिवंदनः** पण हल्लीचे धुलीवंदनाचे स्वरूप पाहता रेन डान्स आयोजित केला जातो. काही ठिकाणी वेगवेगळे मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. जिथे नाच व काही गेम्स वगैरे ठेवले जातात. सोसायटीमधील लहान मुले स्वतःला वेगवेगळ्या रंगांमध्ये रंगवून घेतात. अक्षरशा ओळखता देखील येत नाहीत.

सकाळपासून दुपारपर्यंत रंगपंचमीचा आस्वाद घेतला जातो. रंगीत फुगे, रंगीत पिचकारी, इतर रंगीत पाणी यांच्या वापर या धुलिवंदनात हमखास होतो. सफेद रंगाचे कपडे घालून ते अजून रंगीत करून टाकायचे ही एक नवीन संकल्पना या धुलीवंदनात दिसून येते. वेगवेगळे खायचे पदार्थ देखील ठेवलेले असतात. तर असे हे आजच्या पिढीचे धुलीवंदन किंवा रंगपंचमी.

# आगरी लोकांचा फक्त राजकारणासाठी उपयोग करून गावं वाऱ्यावर सोडायची - राजू पाटील

## १४ गावांसाठी अर्थसंकल्पात तरतूद करायला हवी होती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : नवी मुंबई महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या 14 गावांना वनमंत्री गणेश नाईक यांनी विरोध दर्शविल्यानंतर याठिकाणचे राजकारण चांगलेच तापले असून या 14 गावांसाठी अर्थसंकल्पात तरतूद करायला हवी होती. आगरी लोकांचा फक्त राजकारणासाठी उपयोग करून गावं वाऱ्यावर सोडायची हा प्रकार सुरू असल्याची टीका मनसे नेते तथा माजी आमदार राजू पाटील यांनी केली आहे. एकनाथ शिंदे यांनी पालकमंत्री म्हणून या 14 गावांसाठी निधी जाहीर करावा, नवी मुंबईला जोडणारा आडीवली भूतीवली बोगदा रस्ता एमएमआरडीएच्या माध्यमातून पूर्ण करावा अशी मागणी राजू पाटील यांनी केली आहे.

यावेळी बोलतांना राजू पाटील यांनी सांगितले कि, 14 गावं नवी मुंबईत घेण्याबाबत मी जेव्हा लक्षवेधी टाकली होती तेव्हा गणेश नाईक



यांनी जी मागणी केली होती त्याच मागणीवर ते ठाम आहेत. तत्कालीन नवी मुंबई आयुक्त अभिजीत बांगर यांनी सांगितले होते याठिकाणी 5 हजार 900 कोटी येथील इन्फ्रास्ट्रक्चरसाठी तर गावांच्या इन्फ्रास्ट्रक्चरसाठी 591 कोटी खर्च करावे लागतील. काही अतिक्रमणं काढावी लागतील. तीच मागणी त्यांनी पुन्हा केली आहे. त्यांच्या मागणी नुसार या बजेटमध्ये तरतूद करणे आवश्यक होते. येथील आमदारांनी देखील या गावांसाठी मागणी करणे आवश्यक होते.

या गावांबाबत आपला पाठपुरावा सुरू होता समिती देखील सोबत होती. तरी देखील हा रेंगाळण्याचा विषय आहे का असा सवाल करत असून ही 14 गावं कचरा टाकण्यासाठी ठाण्यात घ्यायची आहेत का ? नगरविकास खात्याचे मंत्री एकनाथ शिंदे यांनी याठिकाणी लक्ष दिले पाहिजे असे राजू पाटील यांनी संगितले. तर लोकसभा निवडणुकीपुरती हि बाब पुढे ढकलली नाही तर तेव्हाच विरोध करणार असल्याची बाब गणेश नाईक यांनी उल्लेख केल्याचे पाटील यांनी सांगत आगरी लोकांचा फक्त राजकारणासाठी उपयोग करायचा आणि गावे वाऱ्यावर सोडायची का असा सवाल राजू पाटील यांनी उपस्थित केला.

येथील सरकारी जागेवर यांच्याच कच्चे बच्च्यानी गोडाऊन बांधलेत. होम गार्डच्या जागेवर देखील गोडाऊन बांधले आहेत. गणेश नाईक बोलले ते बरोबर बोललेत, त्यांचं नवी मुंबई शहरावर प्रेम आहे. यांच्यासारखे ते ओरडबडून नेणारे नाहीत. त्यामुळे ही 14 गावं आगरी बहुल गावं असून या गावांबाबत सहानभूतीने विचार करून यांवर मार्ग काढावा अशी मागणी मनसे नेते तथा माजी आमदार राजू पाटील यांनी केली आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
**जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
**प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!**

| | कोर्स | कालावधी |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२२४) | ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558



# अंबरनाथ नगरपालिकेत जाणीव जागृती कार्यशाळा संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : अंबरनाथ नगरपालिका कार्यालयात मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे व अंबरनाथ बदलापूर विकासक व वास्तू विशारद संघटनेच्या वतीने “जाणीव जागृती” कार्यशाळेचे आज दि.12 मार्च 2025 रोजी आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पराग सोमण, सक्षम प्राधिकारी ठाणे 2 श्री.प्रशांत जोशी, कार्यकारी अभियंता श्री.राजकुमार पवार, सहाय्यक निबंधक श्री.रोहिदास बांगर, अंबरनाथ बदलापूर विकासक आणि वास्तूविशारद संघटनेचे अध्यक्ष श्री.संजय जाधव, अंबरनाथचे माजी नगराध्यक्ष श्री.सुनील चौधरी, अंबरनाथ पालिकेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री.उमेश राऊत, उपअभियंता श्री.प्रशांत पवार तसेच संघटनेचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी विकासकांनी शहरामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजना कशाप्रकारे राबविता येईल याबाबत माहिती घेतली. तसेच शंकांचे निरसन करुन घेतले.

त्याचप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.पराग सोमण यांनी अंबरनाथ, बदलापूर परिसरातील वास्तुविशारद व विकासक यांनी झोपडपट्टी पुनर्वसनासाठी पुढाकार घ्यावा, शासन आपल्यास सर्वोतपरी मदत करेल, असे आश्वासन दिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती किमया पवार यांनी केले.

# नॅशनल पार्कमधील अपात्र झोपडीधारकांचे ठाणे जिह्यात पुनर्वसन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नॅशनल पार्कमधील वन जमिनीवर अतिक्रमण तर झाले, पण अतिक्रमण होऊ नये यासाठी भिंत बांधल्यानंतरही अतिक्रमण झाले आहे. सरकारने अशांसाठी पहिल्या टप्प्यात 11 हजार 359 कुटुंबांना एसआरएमार्फत चांदिवली येथील संघर्षनगर येथे घरे बांधली आहेत, तर 299 जणांना घरे देणे शिल्लक आहे. दुसऱ्या टप्प्यातील 13 हजार 486 कुटुंबांना घरे देण्याचा प्रस्ताव आहे, मात्र अपात्रांचे ठाणे जिह्यात पुनर्वसन केले जाणार आहे, अशी माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी विधान परिषदेत दिली.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील (नॅशनल पार्क) झोपडीधारकांचे पुनर्वसन रखडले आहे. सरकारने त्याबाबत काय पावले उचलली आहेत, घरे कधी मिळणार, पुनर्वसन कसे करणार त्याचबरोबर टीडीआरचा घोटाळा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई कधी करणार, असा प्रश्न राजहंस सिंह आणि भाई जगताप यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून केला. त्यावर वनमंत्री गणेश नाईक यात टीडीआर घोटाळा झाला असेल तर चौकशी करू, असे आश्वासन दिले.

आरे कॉलनीत आदिवासी पाड्यांचे पुनर्वसन

नॅशनल पार्कमधील 45 आदिवासी पाड्यांतील दोन हजार कुटुंबांचे आणि पात्र झोपडीधारकांचे आरे कॉलनीतील 90 एकरमध्ये पुनर्वसन केले जाणार आहे, मात्र हा भाग पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील आहे. त्यामुळे पालिकेकडून झोनल मास्टर प्लॅन तयार केला जाणार आहे.



हा मास्टर प्लॅन तयार झाला की त्याची अंमलबजावणी केली जाईल, अशी माहिती गणेश नाईक यांनी दिली.

# पोलीस हवालदार अभिषेक उबाळे यांना शरीरसौष्ठव स्पर्धेत सूवर्णपदक



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे,दि.** : नुकतीच 35 वी महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा 2025 ठाणे येथे संपन्न झाली. या स्पर्धेत पोलीस हवालदार 8389 अभिषेक चंद्रशेखर उबाळे (नेमणूक मध्यवर्ती पोलीस स्टेशन, ठाणे शहर) यांनी शरीरसौष्ठव स्पर्धेत 70 किलो वजनी गटात प्रथम क्रमांक प्राप्त करून सूवर्णपदक मिळविले. त्यांनी यापूर्वी देखील 2023 आणि 2024 या वर्षात झालेल्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले आहे. 2023 मध्ये हरियाणा येथे पार पडलेल्या ऑल इंडिया पोलीस गेम्स मधील शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये रजत पदक प्राप्त केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल ठाणे शहर पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी त्यांचे अभिनंदन केले असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# धुलिवंदनानिमित्ताने येऊरच्या जंगलात जंगी पार्ट्या?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील असलेल्या येऊरच्या जंगलात यावर्षी होळी आणि धुलिवंदनानिमित्ताने पुन्हा एकदा जंगी पार्ट्यांचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्ट्यांमध्ये मोठ्या आवाजातील ध्वनीक्षेपकावर नाचगाणी, पाण्याची नासाडी होणार आहेत. त्यासाठी एक हजार ते दोन हजार रुपयांचे तिकीट देखील आहे. मद्यपान देखील या हॉटेलमध्ये होणार आहे. त्यामुळे प्राण्यांच्या या जंगलात हुल्लडबाजांच्या पार्टीला केव्हा आवर बसणार असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वीच, या जंगलातील मुख्य रस्त्यावर दोन बिबट्यांचा वावर आढळला होता. असे असतानाही पार्ट्या आयोजित केल्याने वन्य जीवांच्या अधिवासाविषयी चिंता व्यक्त केली जात आहे. मुंबईमध्ये विस्तीर्ण पसरलेल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा येऊर वन परिक्षेत्र हा पर्यावरणीदृष्ट्या अत्यंत संवेदनशील आहे.

या जंगलामध्ये बिबट्यांसह विविध प्राणी, पक्षी, कीटक आणि दुर्मिळ वनस्पती आढळते. असे असले तरी या जंगलामध्ये बेकायदा बांधकामे, हॉटेल आणि टर्फ तयार झाले आहेत. त्यामुळे जंगलाचे लचके तुटले आहेत. रात्री उशीरापर्यंत सुरू असलेले विवाह समारंभ, त्यासाठी वापरण्यात आलेला प्रखर प्रकाशझोत यामुळे निशाचर प्राणी पक्षी यांच्यावर त्याचा परिणाम होतो. येथील गोगांटाविरोधात पर्यावरणवादी आणि गावकऱ्यांनी मोहीम हाती घेतली होती. त्यानंतर काही प्रमाणात येथील पार्ट्यांवर निर्बंध आली होती. परंतु आता पुन्हा या पार्ट्या सुरू झाल्याचे स्पष्ट होत आहे.

# झोपडपट्टी पुनर्वसनाचे ५१७ प्रकल्प रखडले

## २७३ विकासकांना हटवले



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : सायन कोळिवाडा आणि मुंबईतील अन्य रखडलेल्या 517 झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांपैकी 273 विकासकांना काम न सुरू केल्यामुळे हटवण्यात आले आहे. जे विकासक ठरलेल्या कालमर्यादेत प्रकल्पाचे काम सुरू करत नाहीत, त्यांना अंतिम नोटीस दिली जाईल. तरीही जबाबदारी पार पाडली नाही, तर कठोर कारवाई केली जाईल, असे गृहनिर्माण मंत्री शंभुराजे देसाई यांनी विधानसभेत स्पष्ट केले.

लक्षवेधी सूचना उपस्थित करताना कॅप्टन आर. तमिळ सेल्वन यांनी सायन कोळिवाड्यासह अनेक SRA प्रकल्प 15 वर्षांपासून अपूर्ण असल्याकडे सरकारचे लक्ष वेधले. “विकासकांना एलओआय (LOI) मिळूनही काम सुरू होत नाही. झोपडीधारकांना भाडे मिळत नाही. अधिकारी विकासकांच्या बाजूने भूमिका घेतात. मूळ मालकांना कोर्टकचेरीत अडकवले जाते, पात्रतेसाठी तीन-चार लाख रुपयांची मागणी केली जाते,” असे त्यांनी सांगितले. काँग्रेस आमदार अस्लम शेख यांनीही विकासकांना पाठिशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली.

भाजप आमदार राम कदम यांनी त्यांच्या मतदारसंघातील 20 वर्षांपासून रखडलेल्या SRA प्रकल्पांची उदाहरणे देत, “SRA विभागात आठ-आठ वर्षे बसलेले भ्रष्ट अधिकारी का बदलले जात नाहीत? नियमानुसार तीन वर्षांत बदल्या का होत नाहीत?” असा सवाल उपस्थित केला. तसेच, त्यांनी या अधिकाऱ्यांची यादी लवकरच सादर करणार असल्याचे जाहीर केले.

मंत्री शंभुराजे देसाई यांनी सर्व नावे सांगितलेल्या अधिकाऱ्यांचा ट्रॅक रेकॉर्ड तपासला जाईल, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या मार्फत चौकशी करून दोषी आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल, असे विधानसभेत स्पष्ट केले.

# शंभर दिवसांच्या कृती आराखड्यांतर्गत भिवंडी मनपात भागधारकांची बैठक संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी दिनांक** १३ - रोजी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या स्व. विलासरावजी देशमुख सभागृहात मा. अतिरीक्त आयुक्त (1) श्री. देविदास पवार यांचे अध्यक्षतेखाली शहरातील सर्व भागधाराकांची (stake holder) बैठक आयोजीत करण्यात आली होती. मा. अतिरीक्त आयुक्त श्री. देविदास पवार यांनी या बैठकीस प्रथम सर्व उपस्थितांना मार्गदर्शन करुन, बैठकीचे उद्देश नमुद केले. या बैठकीस शहरातील खालील संघटनांना आमंत्रित करण्यात आले होते.1. पावरलूम, सायझिंग अँड डाईंग असोसिएशन2. वेअर हाऊस अँड लॉजिस्टिक असोसिएशन3. इंडियन मेडिकल असोसिएशन4. वाहतूक आणि लॉरी संघटना5. टोरंट पॉवर कार्यालय6. सिक्युरिटी एजन्सी7. अमेझॉन8. कामगार मजूर संघटना9.कौशल्य प्रशिक्षण संस्था VTP10. शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण




संस्था11. बिल्डर असोसिएशन, MCHI, आर्किटेक्चर असोसिएशन, CREDAI12. भिवंडी प्लास्टीक मोती असोसिएशन13. भिवंडी डिस्ट्रीबुटर्स असोसिएशन14. हॉटेल असोसिएशन 15. मिलस्टोअर असो. व इतर वरील आमंत्रित संघटनांपैकी बहुतेक संघटनांचे प्रतिनिधी बैठकीस उपस्थित होते. या बैठकीमध्ये खालील मुद्दे चर्चेस घेण्यात आले.1. शहर विकासासाठी शहरात औद्योगिक धोरण राबविण्यासाठी प्रोत्साहन व पोषक वातावरणाबाबत.2. शहर औद्योगिक धोरणाबाबत अडीअडचणी बाबत चर्चा करणे.3. शहर सौंदर्यीकरण Corporate Social Responsibility (CSR) फंडातुन करणेबाबत सहभाग नोंदविणे.4. "माझी भिवंडी, स्वच्छ भिवंडी" अभियान राबविण्याबाबत. सदर बैठक ही शहरातील उद्योग धंद्यांमध्ये गुंतवणुक वाढविणे, रोजगार निर्मीती आणि कंपनी सामाजिक दायित्व निधीतून सौंदर्यीकरण करणे याबाबत चर्चा करणेकरिता होती. उपस्थित व्यापाऱ्यांनी महानगरपालिकेच्या आवाहनास पाठिंबा दर्शविला. परंतु, शहरातील पायाभुत सुविधा जसे रस्ते, पाणी, स्वच्छता, अतिक्रमण इत्यादीमध्ये सुधारणा करण्याची मागणी केली. जेणेकरुन शहरामधील सर्व व्यवसायांना चालना मिळेल. यामुळे शहरातील रोजगार संधीमध्ये वाढ होईल, तसेच, घर बांधणी क्षेत्राला चालना मिळेल. या सर्व व्यापारांना चालना मिळाल्यानंतर कंपन्यांचे सामाजिक दायित्व निधी (CSR FUND) मधुन महानगरपालिका क्षेत्रातील विविध क्षेत्रांचे सुशोभिकरण करता येईल. या बैठकीस मा. अतिरीक्त आयुक्त (2) श्री. विठ्ठल डाके, उपायुक्त (मुख्या) श्री. रोहिदास दोरकुळकर, उपायुक्त (समाजकल्याण) श्रीमती प्रणाली घोंगे, सहायक आयुक्त (समाजकल्याण) श्री. मिलींद पळसुले, सहायक आयुक्त (प्रशासन) श्री. अजित महाडीक, समाज कल्याण विभागप्रमुख श्री. नितेश चौधरी हे उपस्थित होते.

# शिक्षिकेच्या घराला आग बारावीच्या उत्तरपत्रिका खाक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**<u>वसई:</u> विरार मध्ये एका शिक्षिकेच्या घराला आग लागल्याची घटना घडली आहे. या आगीत घरी तपासणीसाठी बारावी वाणिज्य शाखेचे आणलेल्या उत्तरपत्रिका जळून खाक झाल्या आहे. यात सुमारे १७० हून अधिक उत्तरपत्रिका जळून गेल्याने त्याचा विद्यार्थ्यांच्या निकालावर परिणाम होण्याची शक्यता आहे. विरार पश्चिमेच्या नानभाट रस्त्यावर असलेल्या गॉड ब्लेस बंगला येथे राहणाऱ्या एका शिक्षिकेने बारावीच्या उत्तरपत्रिका तपासणीसाठी घरी आणल्या होत्या. घरात कोणी नसताना १० मार्च रोजी दुपारच्या सुमारास शॉट सर्किट होऊन घराला आग लागली होती. या आगीवर वसई विरार महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी पोहचून आगीवर व परिस्थितीवर नियंत्रण मिळविले होते.**

# नवी मुंबई होणार आर्थिक विकासाचे केंद्र

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

## नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय बाजार

**मुंबईतील वांद्रे कुर्ला कॉम्पलेक्स अर्थात बीकेसीच्या धर्तीवर खारघर येथे व्यावसायिक कॉर्पोरेट पार्कची उभारणी केली जाते आहे. त्यामुळे नवे उद्योग आणि व्यवसाय केंद्र खारघर येथे तयार होणार आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे या पार्कला अनन्यसाधारण महत्व प्राप्त होणार आहे. त्याच अनुषंगाने राज्य सरकाराने आता नवी मुंबई आंतरराष्ट्रीय बाजार स्थापन करण्याची घोषणा केली आहे. मुंबईपासून नवी मुंबई आणि परिसराचे नव्या अटल सेतू आणि किनारी मार्गामुळे कमी झालेले अंतर, परिसरात सुरू असलेल्या नव्या जोड रस्त्यांची कामे, जवाहरलाल नेहरू बंदर न्यास ते बडोदे महामार्ग, मेट्रो मार्गिका अशा वाहतुकीच्या पर्यायांमुळे या नव्या आर्थिक विकास केंद्र आणि आंतरराष्ट्रीय बाजार याच्यासह इतर प्रकल्पांच्या उभारणीला बळ मिळणार आहे.**

**ठाणे** : मुंबई महानगर प्रदेश आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक विकास केंद्र अर्थात ग्रोथ हब म्हणून विकसीत करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्याच अनुषंगाने नुकत्याच सादर झालेल्या अर्थसंकल्पात ठाणे जिल्ह्यात नवी मुंबई आणि खारघर या दोन ठिकाणी विकास केंद्रांची स्थापना करण्याची घोषणा करण्यात आली आहे. सोबतच नवी मुंबईत महामुंबई आंतरराष्ट्रीय बाजार स्थापन केला जाणार आहे. रोजगार वाढीसह येथील विकासाला यामुळे चालना मिळणार आहे. निती आयोगाच्या शिफारशीनुसार मुंबई महानगर क्षेत्राला जागतिक आर्थिक केंद्र म्हणून विकसीत केले जाणार आहे. एक ट्रिलीयन अर्थव्यवस्था करण्यासाठी विविध निर्णय घेण्यात आले आहेत. रोजगार, परवडणारी घरे यांच्यासह उद्योग, वाणिज्य केंद्र अशा विविध प्रकल्पांची उभारणी या अंतर्गत केली जाणार आहे. त्याच धर्तीवर मुंबई महानगर प्रदेशातील ठाणे जिल्हा आणि पर्यायायने नवी मुंबई हे मोठे आर्थिक केंद्र म्हणून पुढे येणार आहे. काही दिवसांपूर्वी याच पार्श्वभूमीवर लॉजिस्टीक पार्कची घोषणा करण्यात आली. यात भिवंडीत हे पार्क उभारले जाणार आहे.

सध्या राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशनात सादर झालेल्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सात आर्थिक विकास केंद्र विकसीत करण्याची घोषणा केली. यात ठाणे जिल्ह्यातील नवी मुंबई आणि खारघर या दोन शहरात हे केंद्र उभारले जाणार आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून यापूर्वीच विकास केंद्राची घोषणा करण्यात आल होती. त्याच पार्श्वभूमीवर राज्याच्या अर्थसंकल्पात जाहीर झालेल्या ठाणे जिल्ह्यातील आणि विशेषतः नवी मुंबईतील या केंद्रांमुळे अर्थव्यवस्थेला बळकटी मिळणार आहे. पायाभूत सुविधांच्या उभारणीमुळे या भागात आंतरराष्ट्रीय कंपन्या कार्यरत आहेत. नवी मुंबईतच जेम्स ॲंड ज्वेलरी पार्कची उभारणी केली जाते आहे. सुमारे एक लाख रोजगारांची निर्मिती करणाऱ्या अशा प्रकल्पांमुळे नवी मुंबई नवे आर्थिक केंद्र ठरणार आहे.

# पनवेल पालिकेची ३५ कोटी रुपयांची कर वसुली




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल** : पनवेल महापालिकेने थकीत मालमत्ता करवसूलीसाठी अटकावणी करण्याची मोहिम हाती घेतल्यामुळे एका महिन्यात तब्बल ३५ कोटी रुपयांचा मालमत्ता कर पालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे. पनवेल महापालिकेचा १८०० कोटी रुपयांचा कर थकीत आहे.पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी कर वसूलीचे उदिष्ट पालिका अधिकाऱ्यांना दिल्यानंतर १४ वेगवेगळी पथके महापालिकेच्या पाचही प्रभागात सक्रिय झाली आहेत. त्याचा परिणाम म्हणून करदाते मालमत्ता कर भरू लागले आहेत.

पालिकेच्या कर विभागाचे अधीक्षक महेश गायकवाड, कर अधीक्षक सुनील भोईर यांच्या नेतृत्वाखाली थकीत कर न भरणाऱ्या विरोधात जप्ती व अटकावणीची कारवाई सुरू आहे. मागील चार दिवसांमध्ये २५ मालमत्तांवर कारवाई करण्यात आली. आतापर्यंत पालिकेच्या तिजोरीत ३५८ कोटी रुपयांचा कर जमा करण्यात पालिकेला यश आले आहे. गेल्या चार दिवसांमध्ये साडेसहा कोटींचा भरणा झाला आहे.

यामध्ये भारती विद्यापीठ, युनायटेड ब्रेव्हरेज, ग्रोवेल, वेस्टर्न सुपर फ्रेश, ग्लास टेक, सहारा, अमुल या कंपन्यानी कराची मोठी रक्कम पालिकेकडे जमा केली आहे.

> “ **थकबाकीदारांनी आपला मालमत्ता कर लवकरात लवकर भरावा, अन्यथा अटकावणी कारवाईस सामोरे जावे लागेल. तसेच मालमत्ता कर न भरल्यास त्याच्या शास्तीमध्ये प्रतिमहा २ टक्क्यांची वाढ होत आहे. नागरिकांनी मालमत्ता कर भरून महापालिकेस सहकार्य करावे.**
> **- स्वरूप खारगे,**
> **उपायुक्त,**
> **पनवेल पालिका**


# डोंबिवलीतील वंदे मातरम उद्यानास पारितोषिक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : डोंबिवली एमआयडीसीतील मिलापनगर रेसिडेन्ट वेल्फेअर असोसिएशनच्या नियंत्रणाखालील शिळफाटा रस्त्यालगतच्या वंदे मातरम उद्यानास सार्वजनिक उद्यान विभागात नंदनवन सुंदर बाग स्पर्धेत तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. बालभवन येथील एका कार्यक्रमात मिलापनगर रहिवासी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी हे पारितोषिक स्वीकारले.कल्याण डोंबिवली पालिका, पर्यावरण दक्षता मंडळ, डोंबिवली इनरव्हिल क्लब पूर्व, पश्चिम आणि डोंबिवली, एनव्हॉयरो व्हिजील या संस्थांनी या सुंदर बाग स्पर्धेचे आयोजन केले होते.

प्रमाणपत्र, स्मृतिचिन्हे असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. एमआयडीसी निवासी विभागात मिलापनगर भागात शिळफाटा सेवा रस्ता आणि उच्च वीज दाब वाहिन्यांच्याखाली अडगळीची जागा होती. झोपडपट्टीधारक याठिकाणी येऊन दरवर्षी ठाण मांडायचे. ही जागा झोपडपट्टीधारकांनी गिळंकृत करण्याचे नियोजन केले होते. मिलापनगर रेसिडेन्ट वेल्फेअर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी कोणत्याही परिस्थितीत ही अडगळीची जागा आपण उद्यान म्हणून विकसित करण्याचे ठरवले. एमआयडीसीचे यासाठी सहकार्य घेण्यात आले. मिलापनगर रहिवासी संघटनेच्या सदस्यांनी वर्गणी काढून काही दात्यांनी चांगली देणगी देऊन मागील चार ते पाच वर्षापूर्वी हे उद्यान विकसित करण्यात आले.

या उद्यानात मनोरंजनाची साधने, बाकडे, ज्येष्ठ नागरिक विरंगुळा कट्टा, प्राणवायू पार्क आहे. उद्यानात विविध प्रकारची झाडे लावून ती जगविण्यात आली आहेत. उद्यानात पाण्याची व्यवस्था, दिवे, आसनव्यवस्था करण्यात आली आहे. उद्यानात दररोज सकाळ, संध्याकाळ एमआयडीसीसह परिसरातील नागरिक फिरण्यासाठी येतात. ज्येष्ठ नागरिक, वृध्दांचे हे विरंगुळ्याचे ठिकाण आहे.



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

# ह्युमॅनिटी ग्लोबल फाऊंडेशन तर्फे शालेय वस्तू वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : जागतिक महिला दिनानिमित्त ह्युमॅनिटी ग्लोबल फाऊंडेशन तर्फे माणगाव तालुक्यातील जिल्हा परिषद खर्डी खुर्द आदिवासी शाळा व अंगणवाडीतील मुलांना शालेय वस्तू, नविन कपडे व खाऊ वाटप करण्यात आला. कार्यक्रमला उपस्थित असलेल्या सर्व महिलांना भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. आदिवासी वाडीतील उपस्थित महिला व मुलींना साडी व ड्रेस वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे जांभुळवाडी गावातील मुलांना शालेय वस्तू व खाऊ वाटप करण्यात आला. या कार्यक्रमला ह्युमॅनिटी ग्लोबल फाऊंडेशनचे सदस्य दिपक पवार, राजेन्द्र पुजारी, संतोष उनवणे, अनंत खडतरे, शिवाजी पिंपळे, जितेंद्र पवार, प्रभाकर कुटे, राकेश बामणे, अजय शिगवण, चेतन महामुनी उपस्थित होते. शाळेतील शिक्षिका उज्वला जाधव व अंगणवाडी शिक्षिका मानसी यांनी हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सहकार्य केले.



## संक्षिप्त

### पानिपत येथे 'मराठा शौर्य स्मारक' होणार - मंत्री जयकुमार रावल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : मुंबई दि. १३ : पानिपत येथे मराठा युद्धवीरांचे शौर्य स्मारक राज्य शासनाच्या वतीने उभारले जाईल, अशी घोषणा मराठा शौर्य दिन कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी केली होती. त्यानुसार शासन आदेश निर्गमित झाला आहे. शासनाच्या वतीने सर्व प्रक्रिया पूर्ण करून हरियाणा राज्यातील पानिपत येथील 'कालाअंब' परिसरात लवकरच 'मराठा शौर्य स्मारक' उभारले जाईल, अशी माहिती पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

या यासंदर्भात अधिक माहिती देताना मंत्री श्री. रावल म्हणाले की, हरियाणा राज्यातील 'कालाअंब' येथे लवकरच या स्मारकासाठी जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया सुरू होईल. त्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजा यांचा भव्य पुतळा उभा केला जाईल. तसेच मराठा शौर्याचे प्रतीक असणारे संग्रहालय, दृकश्राव्य कार्यक्रम व आवश्यक त्या सुविधा निर्माण केल्या जातील. यासाठी हरियाणा राज्य शासनाशी समन्वय साधण्यासाठी मी स्वत: समन्वयक म्हणून काम करणार आहे. या प्रकल्पाला जमीन अधिग्रहित करण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास विभाग नोडल यंत्रणा म्हणून काम करणार आहे. मराठा साम्राज्याचा जाज्वल्य इतिहास लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आवश्यक ते उपक्रम राबवण्यात येतील.

सतराव्या आणि अठराव्या शतकात मराठा साम्राज्याचा विस्तार अफगानिस्तानापर्यंत झाला होता. मराठा शौर्य वीरांच्या अतुलनीय पराक्रमामुळे अटक पासून ते कटक पर्यंत हिंदवी स्वराज्याचा झेंडा रोवला गेला. १७६१ साली अहमदशाह अब्दाली विरुद्ध झालेल्या पानिपत रणसंग्रामामध्ये मराठा वीरांनी झुंज दिली. या लढाईत मराठा साम्राज्याची अपरिमित अशी हानी झाली मात्र इतिहासामध्ये ही लढाई त्याग, बलिदान, राष्ट्रप्रेम, लढाऊ वृत्ती, राष्ट्राकरिता संपूर्ण समर्पण या करिता संस्मरणीय आहे. तसेच या युद्धातील मराठा वीरांच्या बलिदानाला नमन करण्याच्या उद्देशाने हे मराठा शौर्य स्मारक होत आहे, असेही मंत्री श्री. रावल यांनी सांगितले.

### झिडके-अंबाडी ग्रामीण तालुका मंजुरीसाठी सहविचार सभेचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

झिडके-अंबाडी: गेल्या अनेक वर्षांपासून झिडके-अंबाडी नवीन ग्रामीण तालुका प्रस्ताव शासन दरबारी प्रलंबित असून,शासनाच्या या दुर्लक्षित प्रश्नाकडे लक्ष वेधून,तो मार्गी लावण्याबाबत " माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ " भिवंडी तालुका यांच्या पाठपुराव्यानंतर राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सद्यस्थितीत झिडके-अंबाडी नवीन ग्रामीण " अप्पर तालुका " मंजुरी कामी लेखी स्वरूपात तत्वत: प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे.

झिडके-अंबाडी तालुका नवीन ग्रामीण तालुका निर्मितीसाठी शासनाने सन-1994/95 मध्ये तत्कालीन " महसुल कोकण आयुक्त जी.बी. पिंगुळकर" यांची नियुक्ती केली होती,आणि त्यांनीही ही जबाबदारी अत्यंत सकारात्मक दृष्टीकोनातून या ग्रामीण उपेक्षित भागाला योग्य असा न्याय देण्याच्या बाबतीत केलेले आहे.हा प्रस्ताव " पिंगुळकर समिती अहवाल" म्हणून या भागातील जाणकार नागरिकांना चांगल्या प्रकारे माहिती आहे,म्हणून भिवंडी तालुक्यात ग्रामीण भागातील जनतेच्या हिताच्या दृष्टीकोनातून प्रलंबित प्रश्नांपैकी झिडके-अंबाडी तालुका निर्माण होऊन ग्रामीण भागातील जनतेच्या समस्या सुटण्यासाठी भिवंडी तालुक्याचे विभाजन होणे,ही काळाची गरज समजून याबाबत विचार विनिमय करण्याकरिता रविवार दिनांक-16/03/2025 रोजी दुपारी ठिक-2.30 वाजता " रेणुका विद्यालय झिडके" येथे ग्रामीण भागातील नागरिकांची सहविचार सभाआयोजित करण्यात आली आहे. या सभेत सरपंच,उपसरपंच,पोलीस पाटील, सर्वपक्षीय प्रतिष्ठित नागरिक यांना खासकरून निमंत्रण " माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ भिवंडी तालुका " यांच्याकडून लेखी पत्राद्वारे करण्यात आले आहे.

# उष्माघातापासून आपला बचाव करा

## प्रशासनाच्या सूचना पाळा..

प्रादेशिक हवामान केंद्र मुंबई, भारतीय हवामान विभाग यांच्याकडून दि.09 मार्च ते दि.13 मार्च 2025 या कालावधीत ठाणे जिल्ह्यात काही भागात उष्णतेची लाट येण्याबाबत हवामान अंदाज वर्तविण्यात आला आहे. तसेच मार्च 2025 ते मे 2025 या कालावधीत ठाणे जिल्ह्यात संभाव्य उष्णतेची लाट येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यानुषंगाने उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी काय करावे व काय करू नये याबाबतच्या मार्गदर्शक सुचना जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत जारी करण्यात आल्या आहेत. या लेखाच्या माध्यमातून, नागरिकांनी उष्माघाताच्या स्थितीत काय करावे व काय करू नये याबाबत जाणून घेवूया...



### उष्णतेची लाट : काय करावे व काय करू नये

उष्णतेच्या लाटेमुळे शारीरिक ताण पडून मृत्यु होण्याची शक्यता आहे. ज्यामुळे मृत्यू देखील होऊ शकतो. उष्णतेच्या लाटेदरम्यान परिणाम कमी करण्यासाठी आणि उष्मघातामुळे होणारे गंभीर परिणाम टाळण्यासाठी खालील उपाय करू शकता.

1. उष्णतेच्या लाटेची माहिती देण्याकरिता रेडिओ, टि.व्ही., सोशल मिडीया व स्थानिक वृत्तपत्रे प्रसारमाध्यमांचा वापर करावा.
2. जिल्हा नियंत्रण कक्ष/ महानगरपालिका नियंत्रण कक्ष/ विभागीय स्तरावरील नियंत्रण कक्ष व स्थानिक संस्था आणि आरोग्य विभाग यांनी एकत्रित कार्य करावे.
3. सर्व संबंधित विभाग, स्थानिक पुढारी व सामाजिक संस्था यांनी या कार्यात सामील व्हावे.

### उष्माघातापासून बचाव करण्यासाठी काय करावे:-

- तहान लागलेली नसली तरीसुध्दा जास्तीत जास्त पाणी प्यावे.
- हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत.
- बाहेर जातांना गॉगल्स, छत्रो/टोपी, बुट व घपलाचा वापर करावा.
- प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत ठेवावी.
- उन्हात काम करीत असलेल्या व्यक्तींनी डोक्यावर टोपी किंवा छत्रीचा वापर करावा तसेच ओल्या कपड्यांनी डोके, मान व चेहरा झाकावा.
- शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओआरएस, घरी बनविण्यात आलेली लस्सी, तोरणी, लिंबू पाणी, ताक इत्यादीचा नियमित वापर करावा.
- अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावित व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.
- गुरांना छावणीत ठेवावे. तसेच त्यांना पुरेसे पिण्याचे पाणी द्यावे.
- घरे थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करावा. रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्यात.
- पंखे, ओले कपडे यांचा वापर करावा. तसेच थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करावे.
- कामाच्या ठिकाणी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी.
- सूर्य प्रकाशाच्या थेट संबंध टाळण्यासाठी कामगारांना सुचित करावे.
- पहाटेच्या वेळी जास्तीत जास्त कामाचा निपटारा करावा.
- बाहेर कामकाज करीत असताना अधून मधून विश्रांती घेऊन नियमित आराम करावा.
- गरोदर कामगार व आजारी कामगारांची अधिकची काळजी घ्यावी.
- रस्त्याच्या कडेला उन्हापासून संरक्षणाकरिता शेड उभारावेत.
- जागोजागी पाणपोईची सुविधा करावी.

### उष्माघातापासून बचाव करण्यासाठी काय करू नये:-

- लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेऊ नये.
- दुपारी 12 ते 3.30 या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे.
- गडद, घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे.
- बाहेर तापमान अधिक असल्यास शारिरीक श्रमाची कामे टाळावीत. दुपारी 12 ते 3.30 या कालावधीत बाहेर काम करणे टाळावे.
- उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळावे. तसेच मोकळया हवेसाठी स्वयंपाकघराची दारे व खिडक्या उघड्या ठेवाव्यात.

तरी, ठाणे जिल्ह्यातील नागरिकांनी उष्माघातापासून बचाव करण्यासाठी वरील सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष अशोक शिनगारे आणि निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.संदिप माने यांनी केले आहे.

**लेखक**
**मनोज सुमन शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी**
**ठाणे**

## नवी मुंबई महानगरपालिका आयोजित
# आंतरशालेय सांस्कृतिक चषक अंतिम फेरीचा शुभारंभ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या वतीने प्रत्येक वर्षी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. यामध्ये नवी मुंबई शहरातील शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक चषक अंतर्गत नृत्य स्पर्धा, गायन स्पर्धा, लघुनाटिका स्पर्धा व पथनाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक 12 मार्च 2025 रोजी पथनाट्य आणि लघुनाट्य या स्पर्धांच्या अंतिम फेरीस विष्णुदास भावे नाट्यगृह वाशी येथे सुरुवात झाली. पथनाट्य आणि लघुनाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्राथमिक फेरीतून निवड झालेल्या प्रत्येकी १० शाळांनी आपली कला सादर केली. पथनाट्य स्पर्धेचे परीक्षण सुप्रसिध्द अभिनेते श्री अरुण कदम व श्री अनिल सुतार यांनी केले. लघुनाटिका स्पर्धेचे परीक्षण अभिनेते श्री विकास पाटील यांनी केले. या कार्यक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपायुक्त श्रीम. अभिलाषा म्हात्रे पाटील, महापालिका सचिव श्रीम. चित्रा बाविस्कर व इतर मान्यवर उपस्थित होते.दिनांक 13 मार्च 2025 रोजी गायन व नृत्य स्पर्धेची अंतिम फेरी होणार असून गायन स्पर्धेचे परीक्षण नामांकित संगीतकार श्री. राहुल रानडे आणि नृत्य स्पर्धेचे परीक्षण सुप्रसिध्द कलावंत श्री. नकुल घाणेकर करणार आहेत.




गायन व नृत्य स्पर्धेची अंतिम फेरी झाल्यानंतर आंतरशालेय सांस्कृतिक चषक स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ सायं ५ वाजता विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी येथे संपन्न होणार आहे.

# जनकल्याण यात्रेचे ठाणे जिल्ह्यात उत्साहात स्वागत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता ठाणे : राज्याच्या विशेष सहाय्य विभाग यांच्या वतीने "जनकल्याण यात्रा 2025" चे आयोजन राज्यभर करण्यात आले आहे. या यात्रेच्या माध्यमातून विशेष सहाय्य विभागाच्या सर्व योजना जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम मोबाईल एलईडी व्हॅनमार्फत राज्यातील 34 जिल्ह्यांमध्ये करण्यात येत आहे. या जनकल्याण यात्रेचा शुभारंभ विशेष सहाय्य विभागाचे मंत्री श्री.नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते नुकताच दिंडोरी, नाशिक येथे संपन्न झाला आहे.

जनकल्याण यात्रेचे राज्यभर कार्यक्रम होत असून ठाणे जिल्ह्यामध्ये आज ही जनकल्याण यात्रा पोहोचली असून ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या यात्रेचे स्वागत निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) हरिश्चंद्र पाटील, तहसिलदार (संजय गांधी योजना) संदीप थोरात, तहसिलदार मिरा-भाईंदर निलेश गौड व इतर अधिकारी-कर्मचाऱ्यांनी केले. यावेळी विशेष सहाय्य विभागाच्या योजनांवर आधारित दिग्दर्शक व निर्माता शंकर बारवे यांनी तयार केलेला माहितीपट मोबाईल एलईडी व्हॅनद्वारे दाखविण्यात आला. त्याचबरोबर योजनेची माहितीपत्रके लाभार्थ्यांना देऊन योजनेची माहिती देण्यात आली. या यात्रेदरम्यान मोबाईल एलईडी व्हॅनच्या माध्यमातून विशेष सहाय्य विभागाच्या योजनांची माहिती ठाणे जिल्ह्यातील सर्वसामान्यांपर्यंत सर्वदूर पोहोचविण्यात येणार आहे.

विशेष सहाय्य विभागाच्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना, राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना या सहा मुख्य योजना राज्य शासन व केंद्र शासनाच्या कल्याणकारी योजना आहेत.

# अंबरनाथ नगर परिषदेला युवासेनेचा लास्ट अल्टिमेटम

## पथ दिव्यांमध्येही ४० लाखांचा भ्रष्टाचार ; सोमेश्वर बंधूंचा आरोप ...

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : शहरातील आरोग्य, स्वच्छता, अनधिकृत बांधकामे, प्रशासकीय अनागोंदी, विकास कामातील भ्रष्टाचार, व अनियंत्रित प्रशासकीय व्यवस्थे विरोधात युवा सेनेच्या वतीने १५ दिवसांपूर्वी या अंध व कर्णबधिर प्रशासनास श्रवणयंत्र, व चष्मे वाटप करून निषेध मोर्चाचे आयोजन झाले होते. परंतु, सदर प्रकरणी कारवाई करण्याचे आश्वासन तत्कालीन मुख्याधिकारी अभिषेक पराडकर यांनी शिष्टमंडळास दिल्यानंतर हे आंदोलन स्थगित केले होते. आता नव नियुक्त मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड यांना युवासेनेने याबद्दल अंतिम अल्टिमेटम दिलाय. अंबरनाथ युवा सेनेचे राहुल सोमेश्वर आणि विकास सोमेश्वर यांनी प्रशासनास दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, शहरात ठिक ठिकाणी कचरा उचलला जात नसल्याने डासांचा प्रादुर्भाव वाढलाय. तसेच नागरिकांनी केलेल्या तक्रारी व प्रशासकीय निवेदनांस प्रशासनाकडून कोणताही प्रतिसाद दिला जात नाही. या विरोधात प्रशासनानं तत्कालीन मुख्याधिकारी अभिषेक पराडकर यांच्याकडे तक्रारही केली होती. मात्र, उमाकांत गायकवाड हे मुख्याधिकारी म्हणून नविन नियुक्ती झाल्याने आता हा प्रश्न सोडवण्याची जबाबदारी त्यांच्यावर आली आहे. त्यामुळे शिष्टमंडळाने त्यांची भेट घेऊन हा प्रश्न निकाली काढण्याची मागणी केलीय . यावर गायकवाड यांनी सविस्तर माहिती घेऊन कारवाई करण्याची सकारात्मक प्रतिसाद भुमिका दर्शवल्याने तुर्तास सोमेश्वर बंधुनी प्रशासनास कारवाईस वेळ देण्याची तयारी दर्शविलीय. याचसोबत, या बंधूंनी आणखी एक खुलासा करत की, मोरोवली गाव, जावसई गाव व इतर एका सीसी रोडवर पथ दिव्यांमध्येही सुमारे ४० लाखांपर्यंतचा भ्रष्टाचार झाल्याचाही आरोप केलाय.यात, निविदेत नमूद पथ दिव्यांपैकी शेकडो पथदिवे गायब असल्याचे समोर येत आहे. या संदर्भात प्रशासनाने तातडीने चौकशी करून अहवाल प्रसिद्ध करावा आणि संबंधित दोषी अधिकार्यांवर कठोर कारवाई करावी. त्याचप्रमाणे भ्रष्टाचारी ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची मागणी सोमेश्वर बंधू यांनी केलीय. येत्या १५ दिवसांत प्रशासनाने या आश्वासनांची पूर्तता न केल्यास अंध व कर्णबधिर प्रशासनास चष्मे आणि कानाची मशिन देणारे आंदोलन करणार असल्याचा पुनरुच्चार सोमवंशी बंधूंनी केला आहे.



> " आम्ही आंदोलन कर्त्यांसह संबंधित रस्त्यांची पाहणी केली. या स्थळ पाहणी व इतर नस्तींच्या सर्वेक्षणां अंतर्गत पाहणी करून चौकशी अहवाल वरिष्ठांना सादर करू. त्या अनुषंगाने क्रमप्राप्त कारवाईसाठी प्रस्तावित करू त्यामुळे आंदोलन कर्त्यांनी तूर्तास आंदोलनाचा पवित्रा घेऊ नये ."
> - संजय कुंभार,शहर अभियंता, अंबरनाथ परिषद

# रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनारी गस्त वाढवणे गरजेचे - आदिती तटकरे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : रायगड जिल्ह्याला विस्तृत समुद्रकिनारा लाभला आहे. या ठिकाणी तब्बल 31 समुद्र किनारे आहेत. पैकी 28 समुद्र किनारी नागरिकांसह पर्यटकांचा वावर असतो, तर अन्य तीन समुद्रकिनारी वर्दळ कमी असते. यासाठी वर्दळीच्या ठिकाणांसह निर्जन ठिकाणी गस्ती वाढवणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन महिला व बालविकास मंत्री कु आदिती तटकरे यांनी सांगितले.

रायगड पोलीस दलातर्फे अलिबाग समुद्र किनारी पोलीस मित्र शिल्प,अटीव्ही गस्तीकारचे लोकार्पण मंत्री कु. तटकरे यांच्या हस्ते झाले. यावेळी त्या बोलत होत्या.याप्रसंगी जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.



यावेळी बोलतांना कु. तटकरे म्हणाल्या 1993 साली मुंबईमध्ये साखळी बॉम्बस्फोट झाले होते. त्यासाठी वापरण्यात आलेले आरडीएक्स हे रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यातील शेखाडी समुद्र किनारी उतरवण्यात आले होते. त्यानंतर एका बोटीमध्ये एके-47 यासह काही दारुगोळा देखील पोलीसांनी हस्तगत केला होता. त्याचप्रमाणे समुद्रामध्ये सुरु असणाऱ्या डिझेल तस्करीला आळा घालण्यासाठी आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने जिल्ह्यातील समुद्रकिनारी गस्त वाढवणे गरजेचे असल्याचेही मंत्री कु तटकरे यांनी सांगितले.

अलिबाग समद्र किनारी एक एटीव्ही गस्ती कार देण्यात आली आहे. जिल्हा नियोजन समितीच्या नावीन्यपूर्ण योजनेतून अन्य समुद्र किनारी-अटीव्ही गस्तीकार देण्याचे नियोजन करावे, अश्या सूचना त्यांनी जिल्हाधिकारी किशन जावळे यांना यावेळी दिल्या.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Registration No. THC/256/2022-2024